# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २००-२२** **दिनांक ०२/०७/२०२२**

## मुव्हर्स ॲण्ड पॅकर्स चे बहाण्याने घरात प्रवेश करुन चोरी करणारे आरोपीतांस अटक, २ गुन्हे ऊघडकीस - विरार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

विरार पोलीस ठाणे हद्दित मुव्हर्स ॲण्ड पॅकर्स म्हणुन घरातील सामान पॅक करुन शिप्ट करण्यासाठी आलेल्या कामगारांनी सामान पॅक करतेवेळी बॅगमधील किंमती सोने व चांदीचे मौल्यावान दागिने चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक ३१/०५/२२ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं. ५३६/२०२२ कलम ३८०,३४ भा.दं.वि.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयांचा तपास सुरु केला. गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट देवुन तांत्रीक माहितीचे आधारे व गुप्त बातमीदारांमार्फत माहिती काढुन आरोपी नामे १) शुभमकुमार धन्नुलाल वर्मा, रा.ठी. कांदिवली, आकोली रोड, क्रांती नगर, गणेश चाळ,मुंबई-१०१, मुळ रा. ग्राम-पो.बेलथरापुर,ता.जि.बलीया, उत्तरप्रदेश २) दिपक राजेशकुमार विश्वकर्मा, रा.ठी. शितला माता चाळ, विनय टॉवर, कांदिवली पुर्व, मुंबई नं. १०१, मुळ रा. ग्राम-हस्ती, पो. पिंपरी, पोस्टे-भादोई, जि. भदोई, राज्य-उत्तरप्रदेश यांना कुरार, मुंबई येथुन ताब्यात घेऊन तपासअंती अटक केली आहे. आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली असुन त्यांच्याकडुन नमुद गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण रु. ११,००,७०८/- किंमतीचे सोने - चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत.

तसेच सदर आरोपीतांचा मुंबई येथील ओशिवरा पोलीस ठाणे, गु.र.क्र.८४७ /२०२२कलम ३८० भा.दं.वि.सं प्रमाणे मध्ये देखील सहभाग निष्पन्न झाला असुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल किं.अं.रु. ३०,०००/- चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल देखील हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३,विरार , श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, श्री. दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप शेरमाळे, पो.ना. हर्षद चव्हाण, पो.शि.संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सागर घुगरकर यांनी केली आहे.



……..0000………